महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : irdho123@gmail.com website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५९

जा.क्र.: औसंवि/ब/कंत्राटी/वेतन खाते/३५१९७ दिनांक : १२/११/२०२४

# परिपत्रक

**विषय :-** महावितरण कंपनीत कार्यरत असलेल्या बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांचे राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेत वेतन खाते (Salary Account) उघडण्याबाबत.

************

राज्यातील महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपन्यातील बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारासंदर्भातील विविध मागण्यांचे निराकरण करण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीने, राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेत वेतन खाते (Salary Account) उघडल्यास कर्मचाऱ्याच्या अपघाती मृत्यूनंतर बँकेच्या पॉलिसीनुसार वैयक्तिक अपघात विमा संरक्षण, वैद्यकीय मदत तसेच, इतरही बरेच लाभ देण्यात येत असल्याने त्याच धर्तीवर कंत्राटदारांच्या अधिनस्त बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांचे राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेत वेतन खाते (Salary Account) उघडल्यास काय सुविधा मिळतात याबाबत सर्व संबंधित बँकेकडून माहीती घेऊन व त्यानुषंगाने तिन्ही कंपन्यांतील बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांना या योजनेचा लाभ मिळावा या कल्याणकारी हेतूने तिन्ही कंपन्यांच्या वतीने परिपत्रक प्रसारीत करण्याचे निर्देश दिले आहेत.

२. त्यानुषंगाने, बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, आय.सी.आय.सी.आय. बँक, ॲक्सीस बँक आणि एच.डी.एफ.सी बँकेकडून कंत्राटदारामार्फत बाहयस्त्रोताद्वारे कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांना बँकेमार्फत वेतन खात्यावर काय सुविधा देण्यात येतील याबाबतची माहीती मागविली असता, बँक ऑफ इंडिया आणि एच.डी.एफ.सी बँकेने कंत्राटदारामार्फत बाहयस्त्रोताद्वारे कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांसाठी वेतन खात्यावर (Salary Account) विविध लाभ / सुविधा देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

३. कंत्राटदारामार्फत बाहयस्त्रोताद्वारे कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांना सदर बँकेमार्फत वेतन खात्यावर (Salary Account) आजीवन विनामुल्य शुन्य शिल्लक खाते, वैयक्तिक अपघात सुरक्षा कवच, अपघाती मृत्यू झाल्यास विमा संरक्षण (नैसर्गिक मृत्यूसाठी विमा संरक्षण नाही), मोफत हवाई अपघाती मृत्यू संरक्षण, ATM व्यवहार मोफत आणि सर्व बँकेच्या ATM साठी अमर्यादीत मोफत, या सुविधांव्यतिरिक्त विविध अतिरिक्त सुविधा / सेवा जसे की, विनामुल्य डेबिड / क्रेडिट कार्ड, नेट बँकिंगवर मोफत NEFT / RTGS, लॉकर्स, डिमॅट / ट्रेडिंग सुविधा इत्यादी प्रदान केल्या जातील.

४. बँक ऑफ इंडिया आणि एच.डी.एफ.सी बँकेच्या व्यतिरिक्त स्थानिक पातळीवरील इतरही राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत बाहयस्त्रोताद्वारे कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांना वेतन खात्यावर (Salary Account) वरीलप्रमाणे नमूद केलेल्या सुविधा प्रदान करीत

असल्यास बाहयस्रोत कंत्राटी कामगारांच्या सोईनुसार संबंधित बँकेत वेतन खाते (Salary Account) उघडण्याबाबत मार्गदर्शन करावे.

५. सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, आपल्या अखत्यारीतील बाहयस्रोत कंत्राटी कामगारांचे संबंधित कंत्राटदार एजेन्सीमार्फत बँक ऑफ इंडिया, एच.डी.एफ.सी बँक तसेच स्थानिक पातळीवरील इतरही राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत वेतन खाते (Salary Account) उघडण्याकरीता विभागीय कार्यालय स्तरापर्यंत कार्यालयाच्या आवारामध्ये शिबीराचे आयोजन करावे. तसेच, संबंधित बँकेमार्फत कंत्राटी कामगारांसाठी देऊ केलेल्या सुविधा व योजनांचा लाभ कंत्राटदार संस्थेच्या अधिनस्त बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांना मिळेल याबाबत कार्यवाही करावी.

६. सदरचे परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal वरील Circular-(IR Department) येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकीत प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

**(संजय रा. ढोके)**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

प्रत :-
महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत.

D:\SSPisey 3\MISC/letter.docx